# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०४/२०२६ ( बुधवार )**

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयातील ग्रामपंचायत पोट निवडणुक प्रक्रिया, मतमोजणी प्रक्रिया शांततेत यशस्वी रित्या पार पडल्या

दिनांक २८/०४/२०२६ रोजी नागपूर जिल्हयातील एकुण २२ ग्रामपंचायत अंतर्गत ५३ मतदान केंद्रांवर थेट सरपंच व सदस्य पदाकरीता पोट निवडणुक मतदान प्रक्रीया पार पडली तसेच दिनांक २९/०४/२०२६ रोजी मतमोजनी प्रक्रिया पार पडली.

मा. श्री हर्ष ए.पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात जिल्हा विशेष शाखा, नागपुर ग्रामीण आणि सर्व पोलीस स्टेशन यांनी योग्य बंदोबस्त नेमला होता. बुथ बंदोबस्त, पेट्रोलींग बंदोबस्त, स्ट्रायकींग बंदोबस्त, स्ट्रॉगरूम बंदोबस्त, तसेच नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व मतमोजणी केंद्रांवर सुयोग्य पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता. सदर बंदोबस्तात उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्यासह जिल्हयातील पोलीस अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक, जलद प्रतिसाद पथक (QRT) नेमण्यात आले होते. जिल्हयातील मतदान तसेच मतमोजणी प्रक्रियेचा संपूर्ण बंदोबस्त अत्यंत शांततेत आणि यशस्वीरित्या पार पडला.

**बंदोबस्तात नेमलेले सर्व पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी त्यांना नेमुन दिलेले कर्तव्य काटेकोर पणे पार पाडुन कोणत्याही प्रकारची अनुचित घटना किंवा कायदा व सुव्यवस्था धोक्यात येणारी परिस्थिती घडु दिली नाही. बंदोबस्तातील प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष रित्या सहभागी असलेल्या सर्व पोलीस अधिकारी/ अंमलदारांचे मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांनी अभिनंदन केले.**

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# ट्रॅक्टर, पोकलॅंड सह २६ लाख ५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
# अरोली पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक २८/०४/२०२६ रोजी अरोली पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा मसला शिवारात सुर नदीचे पात्रातुन अवैधरित्या पोकलॅंडद्वारे रेतीचे उत्खनन करून ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन पाहणी केली असता तेथील आरोपी हे अंधाराचा फायदा घेत पळुन गेले. घटनास्थळी सॉलीस कंपनीचा टॅक्टर क्र. एम. एच ३३ ए. सी. ८३९९ हा त्याला जोडलेल्या विना क्रमांकाच्या ट्रॉलीसह मिळुन आला. तसेच एक विना क्रमांकाचा पोकलॅंड मिळुन आले. टॅक्टरच्या ट्रॉलीची पंचासमक्ष  पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) टॅक्टर क्र. एम. एच ३३ ए. सी. ८३९९ किंमती ५,००,०००/—रूपये त्याला जोडलेली विना क्रमांकाची ट्रॉली किंमती १,००,०००/—रूपये २) ०१ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये, आणि ३) विना क्रमांकाचा पोकलॅंड किंमती २०,००,०००/—रूपये असा एकुण २६,०५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद टॅक्टर क्र. एम.एच ३३ ए. सी. ८३९९ चा चालक आणि मालक  तसेच पोकलॅंड चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन अरोली येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## वाहनासह ३० लाख ३५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २८/०४/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, टिप्पर मध्ये अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी भिवापूर वाय पॉईंट येथे नाकाबंदी केली असता टिप्पर (ट्रक) क्र. एम एच ३६ ए ए ३७४९ हे वाहन मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. आरोपी टिप्पर चालक नामे **शुभम केवलराम हटवार, वय २६ वर्षे, रा. मागली, ता. पवनी हा मिळुन आला.** पोलीसांनी आरोपी चालका कडील रेती वाहतूकीच्या परवान्याची तपासणी केली असता वाहनात परवान्यापेक्षा अतिरिक्त रेतीची अवैधरित्या वाहतुक करीत असल्याचे निदर्शनास आले. पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन टिप्पर (ट्रक) क्र. एम एच ३६ए ए

३७४९ किंमती ३०,००,०००/—रूपये २) ०७ ब्रास रेती किंमती ३५,०००/— रूपये असा एकुण ३०,३५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं, सहकलम ४८(८), ४८(७) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता १९६६ अन्वये सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधि. १५ पर्यावरण अधि., १३०, १७७ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्री करीता साठवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, १३ हजार २६० रूपयांचा मूद्देमाल जप्त, १ आरोपी अटक, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २७/०४/२०२६ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, मौजा बाजार चौक, धापेवाडा, ता. कळमेश्वर येथे राकेश गोविंदराम देवगिरकर याने त्याचे राहते घरी महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखु विक्री करीता साठा करून ठेवला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा बाजार चौक धापेवाडा, ता. कळमेश्वर येथे आरोपी राकेश गोविंदराम देवगिरकर, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र ०१, धापेवाडा, ता. कळमेश्वर याच्या घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष विविध कंपनीचा एकुण ७.२ किलो प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती १३,२६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. आरोपी विरूद्ध पोस्टे सावनेर येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

# अवैधरीत्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २८/०४/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा मंगळवारी पेठ येथे नाकाबंदी केली असता दुचाकी वाहन ॲक्टीव्हा क्र. एम एच ४०डी जे १०३१ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात विदेशी दारू मिळुन आली. ॲक्टीव्हा चालक **आरोपी नामे पुन्यवर्धन बाबुलाल बोरकर, रा. वेळगाव, ता. कुही** हा अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) वेगवेगळया कंपनीचे ११ विदेशी दारूच्या निपा किंमती १,८३०/— रूपये आणि ॲक्टीव्हा वाहन क्र. एम एच ४० डी जे १०३१ किंमती ५०,०००/—रूपये असा एकुण किंमती ५१,८३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीविरूद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे.**

# पोस्टे कळमेश्वर हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दिनांक २८/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथक अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करत असतांना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, बस स्टॉप कळमेश्वर येथे शुभम अनिल कातकडे हा काही लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता बस स्टॉप कळमेश्वर येथे आरोपी नामे **शुभम अनिल कातकडे, वय २९ वर्ष, रा. वार्ड क्र १६, रेल्वे स्टेशन रोड, टिकले ले आउट, ता. कळमेश्वर** हा कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आला. पोलीसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम ३४०/— रूपये, सट्टापट्टीचे साहित्य, एक मोबाईल किंमती ५०००/—रूपये असा एकुण ५,३४५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी नामे शुभम अनिल कातकडे, वय २९ वर्ष, रा. वार्ड क्र १६, रेल्वे स्टेशन रोड, टिकले ले आउट, ता. कळमेश्वर यांच्या विरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री, वाहतुक करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २२ गुन्हे नोंद

दिनांक २८/०४/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू तसेच दुचाकी वाहन असा एकुण ९६,८९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे १) अर्जुन दत्तुजी लेंडे, वय ३९ वर्ष, रा. कोदामेंढी २) क्रिष्णा उर्फ विक्की नर्सीग नागपूरे, वय अंदाजे ३७ वर्ष, रा. कोदामेंढी याचेवर ०१ गुन्हा नोंद, तसेच आरोपी १) रविंद्र काशीनाथ बारापात्रे, वय ५४ वर्ष, रा. कोदामेंढी, ता. मौदा व महिला आरोपी यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे आरोपी दिपक शैरलाल नेटी, वय २७ वर्ष, रा. सिलघाट, पोस्ट धोबीसर्रा, तह.बरघाट, मध्यप्रदेश ह. मू. बड्डी ,पारशिवनी ता. पारशिवनी, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी १) रोहित राजुजी धुर्वे, वय २१ वर्ष, रा. सालई, ता. रामटेक २) जितेंद्र शेषराव वरखडे, वय २७ वर्ष, रा. सालई, ता. रामटेक याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे आरोपी** नामे बकेश बादल धुर्वे, वय ३२ वर्ष, रा. रौंधा, त. जावरा, जि. बैतुल, ह. मु. नरखेड, त. नरखेड यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे ०२ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल येथे ०२ महिला आरोपी** यांचेवर प्रत्येकी १ असे ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) दिवाना जयराम वाढाई, वय ४० वर्ष, रा. डब्ल्यु सि. एल शक्ती नगर, वाघोडा सावनेर २) लालुराम बाबुराम पासवान, वय ४२ वर्ष, रा. राजकमल चौक, सावनेर ता. सावनेर ३) ०१ महिला आरोपी याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे गोमाजी मोतीराम परतेकी, वय ५५ वर्ष, रा. कोरमेटा, ता. सावनेर, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे तुलाराम तुळशीराम चाचेरकर, वय ६० वर्ष, वार्ड क्र.०२ कुही, ता. कुही यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे १) **पुन्यवर्धन बाबुलाल बोरकर, रा. वेळगाव, ता. कुही २)** महादेव गोमाजी मसराम, वय ७४ वर्ष, रा. देवळी, ता. उमरेड **३)** विनोद रमेश गोहणे, वय ४४ वर्ष, रा. पिरावा तह. भिवापुर ४)

महिला आरोपी याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी आशिष रमेश मने, वय ३० वर्ष, रा. किन्ही, ता. कुही यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे १) प्रफुल हरीचंद्र भैसारे, वय ३० वर्ष, रा. धर्मापुर, ता. भिवापुर, जि. नागपुर २) महेश नारायण मुंत्तलवार, वय ४५ वर्ष, रा भिवापुर, ता. भिवापुर, जि. नागपुर याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १) ८४ लिटर मोहाफुल गावठी दारू २) २९१६० मिली देशी दारू, १९८० मिली विदेशी दारू, ०२ दुचाकी वाहन असा एकुण ९६,८९०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**